VOLUME - VII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.2 (www.sjifacto:.com)

# २. मोलकरीन स्त्रियांच्या कौटुंबिक हिंसाचार पार्श्वभूमीचा समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून अभ्यास

डॉ. प्रमिला भुजाडे
सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, शासकीय ज्ञान--विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद

**प्रस्तावना (Introduction) :**

भारत आज विकसनशील देश असल्याचा दावा करणारा देश आहे. एकविसाव्या शतकात जगात महासत्ता बनण्याचे ध्येय बाळगणारा देश आहे. समाजातील अनेक कुप्रथ नष्ट करणारा देश आहे. परंतु स्त्रियांच्या बाबतीत अत्याचाराचे निर्मूलन करु शकला नाही, हे या देशाचे विदारक सत्य आहे. स्त्रियांवर होणारा हिंसाचार कमी होण्याऐवजी वाढतच आहे. हे गेल्या अनेक वर्षाच्या आकडेवारी वरुन स्पष्ट होते.

स्त्रियांच्या संदर्भात समाजाकडून होत असलेली तिची उपेक्षा, त्यांच्यावर पुरुषप्रधान संस्कृतीच्या माध्यमाने घातली गेलेली बंधने, लिंगभेद बिंबवणारे कुटुंब, सामाजिकरणाच्या पारंपारिक पद्धती, साहित्यातील म्हणी, वाक्यप्रचार व समाजा कडून होत असलेला जाणीवपूर्वक संस्काराचा मारा, स्त्री म्हणून तिच्या कार्यक्षेत्रावर घातलेल्या मर्यादा, लैंगिक नितीमत्तेचे, जात, धर्म व धार्मिक नीतिमत्तेचा फासा टाकून त्यांना अनेक कर्मकांडात व अंधश्रद्धेच्या विळख्यात ठेवण्याच्या प्रतिगामी प्रवृत्ती, त्यांचे आत्मबळ, आत्मविश्वास व स्वावलंबित्वाचे स्पष्टीकरण करणारे सामाजिक मन आणि स्वतः मोलकरणीची आपल्याला नारी म्हणून जोपासण्याची मानसिकता इत्यादीमुळे ती अनेक कौटुंबिक अत्याचाराला बळी पडते. गेलेस प्रमाणे "कौटुंबिक हिंसाचार म्हणजे पुरुषी व्यक्तीची अशी कृती की, जी स्त्रीला त्रास होईल, ती जखमी होईल हा हेतू डोळ्यांसमोर ठेवून केली जाते."

**पूर्व संशोधनाचा आढावा (Review of Literature):**

- **श्रीमती श्रीदेवी गोयल** यांनी महिलांवरील होणा--या अत्याचाराच्या संदर्भात भारतीय दंडसंहिता कलम 498 (अ) या विषयावर अध्ययन केले. त्यांच्या मते महाराष्ट्रात अत्याचाराचे प्रमाण जास्त आहे. त्यात खून, बलात्कार, विनयभंग, मारहाण, हुंडाबळीचा समावेश आहे. या अध्ययनातील निष्कर्ष असे की विवाहानंतरच्या आर्थिक अपेक्षा हे स्त्री अत्याचाराचे कारण 75 टक्के, 94.56 टक्के स्त्रिया 30 वर्षाखालील, 30 ते 50 वयोगटातील अत्याचारग्रस्त स्त्रियांचे प्रमाण 5.44 टक्के होते.
- **भारतीय राष्ट्रीय गुन्हे अभिलेख ब्यूरोच्या** 2015 च्या अहवालानुसार प्रत्येक 26 व्या मिनिटाला एका स्त्रीवर बलात्कार, दर 93 मिनिटाला एक स्त्रीची हत्या होते. 2015 एकूण स्त्रियांवरील 1,55,553 हिंसेच्या प्रकरणांपैकी 68,810 प्रकरणे कौटुंबिक हिंसाचाराचे होते.

वरील संशोधनावरुन कौटुंबिक हिंसाचार व मोलकरीन स्त्रियांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीचा समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून अभ्यास केल्यास त्यावरील भविष्यकालीन काही उपायोजना भाकीत करता येतात. त्यामुळे या



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science

संशोधनाचे महत्त्व वाढीस लागते म्हणून संशोधनकर्तीने प्रस्तुत विषय संशोधनाकरीता निवडला आहे. हेच या संशोधनाचे महत्त्व आहे.

**अध्ययनाचे उद्देश्य (Objectives) :–**

1) कौटूंबिक हिंसाचार कायदा 2005 बद्दल मोलकरीन स्त्रियांमध्ये असलेल्या जाणीव जागृतीचे अध्ययन करणे.

2) कौटूंबिक हिंसाचार मोलकरीन स्त्रियांच्या कौटूंबिक व व्यावसायिक बाबींशी निगडीत असतो का? ज्ञात करणे.

3) मोलकरनींच्या शैक्षणिक दर्जाच्या प्रमाणात कौटूंबिक स्थानात सकारात्मक बदल होतो का इत्यादींचे निरीक्षण करणे.

4) मोलकरीन महिलांचे शिक्षण व कौटूंबिक हिंसाचार यातील परस्पर संबंध जाणून घेणे.

**अध्ययनाचे गृहितके (Hypothesis) :–**

1) कौटूंबिक हिंसाचार कायदा 2005 बद्दल मोलकरीन महिलांमध्ये आजही जाणीव जागृतता नाही.

2) कौटूंबिक हिंसाचार हा मोलकरीन स्त्रियांच्या कौटूंबिक व व्यावसायिक बाबींशी परस्पर संबंधित आहे.

3) शिक्षण आणि कौटूंबिक हिंसाचाराचा परस्पर सहसंबंध आहे.

**मोलकरनीच्या कौटूंबिक हिंसाचारी कारणे आणि परिणाम**

| कारणे | परिणाम |
|---|---|
| • हा माझ्या घरचा मामला आहे. | • एकटेपणा |
| • स्वतःचा बचार करण्याइतपर स्वतः खंबीर नाही. | • पुरुषी वर्चस्व |
| • इतरांना कळल्यास समाजाच्या टिकेचा विषय होईल. | • अवलंबित्व |
| • इतरांना गैरसमज होणे. | • जास्त जबाबदारी |
| • हे ही दिवस जातील. | • दोषी वाटणे |
| • माझ नशीबच वाईट आहे. | • लाज वाटणे |
| • सगळे पुरुष असेच असतात. | • जगण्याची आशा कमी होणे. |
| • ही परिस्थिती इतकी वाईट नाही. | • असाह्यता वाटते |
| • एकटी राहूच शकत नाही. | • निराशाजन्य वाटणे |
| • या वयात बाहेर पडणे अवघड आहे. | • आरोग्यावरील दुष्परिणाम |
| • पैसे कमविण्याचे साधन नाही. | • भावनिक अतिरेक |
| • मुले लहान आहेत. | • स्वतःकडे दुर्लक्ष |
| • मुलांना मी एकटी सर्वकाही देऊ शकणार नाही. | • झोपेच्या तक्रारी |
| • समाज ही स्वीकार करणार नाही एकटी राहिल्याने. | • कुटूंबात तणावाचे वातावरण |
| • मुले आणि त्यांचे भविष्य. | • .काळाजी, चिंता वाढणे |
| | • भावनिक बधिरता येणे. |

**अध्ययन क्षेत्र/विश्व (Study Area) :–**

प्रस्तुत संशोधनासाठी नागपूर जिल्ह्याच्या पश्चिम विभागातील वसंतराव नाईक झोपडपट्टीतील मोलकरीन महिलांचा प्रस्तुत अध्ययन क्षेत्रात समावेश केला आहे.

**नमूना निवड :–**

प्रस्तुत शोध निबंधात नागपूर पश्चिम विभाग येथील 50 मोलकरीन महिलांचा समावेश नमुना निवड म्हणून केला आहे


**तथ्य संकलन (Data Collection) :–**

प्रस्तुत संशोधन कार्यात मिळालेली माहिती ही, मौखिक स्वरुपाच्या उत्तराशी निगडीत आहे. संशोधनाकरीता **"मुलाखत अनुसूची"** व सहभागी निरीक्षण तंत्राचा उपयोग करण्यात आला आहे.

**सारणी क्रं. 01**

**कौटूंबिक हिंसाचाराला जबाबदार असलेल्या घटकांबाबत उत्तरदात्यांचे मत दर्शविणारी सारणी**

| अनु.क्र. | हिंसाचारला जबाबदार घटक | अंशतः | पूर्णतः | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1 | कौटूंबिक घटक | 14 (28) | 36 (72) | 50 (100) |
| 2 | व्यावसायिक घटक | 17 (34) | 33 (66) | 50 (100) |




उपरोक्त सारणीवरुन असे निदर्शनास येते की, 50 मोलकरनीपैकी 36 म्हणजे 72 टक्के उत्तरदरात्यांच्या मते कौटूंबिक हिंसाचाराला कौटूंबिक घटक जबाबदार असून कौटूंबिक घटकांपैकी पती हा सर्वात जास्त जबाबदार असलेला घटक आहे. 33 म्हणजे 66 टक्के उत्तरदात्यांच मते व्यावसायिक घटक जबाबदार असून स्त्रियांची आर्थिक मिळकत, व्यवसायात होणारा वेळ, खर्च व पुरुषांची संशयी वृत्ती हे सर्व घटक जबाबदार आहेत.

कौटूंबिक हिंसाचाराला कौटूंबिक व व्यावसायिक हे दोन्ही घटक जबाबदार आहेत. पुरुषांची भोगवादी प्रवृत्ती, महिलांना हीन लेखण्याची वृत्ती, कामाचे तास, कौटूंबिक घटकाची अहवेलना, या कामाकडे बघण्याचा दृष्टीकोण यात बदल न झाल्याने घर कामकरणा–यां स्त्रिया कौटूंबिक हिंसाचाराला बळी पडतात.





**सारणी क्रं. 02**

**शैक्षणिक दर्जा व कौटूंबिक स्थानाबाबत मत दर्शविणारी सारणी**

| अनु. क्र. | शैक्षणिक दर्जा | कौटूंबिक स्थानातील बदल | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | अंशतः सकारात्मक | पूर्णतः सकारात्मक | बदल होत नाही | |
| 1 | उच्च | 42 (84) | 04 (08) | 04 (08) | 50 (100) |


उपरोक्त सारणी वरुन असे निदर्शनास येते की, 42 म्हणजे 84 टक्के उत्तरदात्यांच्या मते स्त्रियांचा शैक्षणिक दर्जा जरी उच्च असला तरी त्यांच्या कौटूंबिक स्थानात पुरेसा बदल न होता केवळ अंशतः सकारात्मक बदल होतो.

उपरोक्त सारणीवरुन असा निष्कर्ष काढला जाऊ शकतो की, सरकारचे निःशुल्क व सक्तीचे शिक्षण स्त्री शिक्षणासह तिच्या सक्षमीकरणाकरीता राबविले जात असले तरी त्यांच्या कौटूंबिक स्थानात फारसे परिवर्तन झाले असे आढळून आले नाही. उच्च शिक्षीत स्त्रियांच्या कौटूंबिक अत्याचारांच्या स्वरुपात आणि प्राथमिक शिक्षित महिलांच्या सोबत होणा–या कौटूंबिक अत्याचाराच्या स्वरुपात वैधर्म्यता आहे. मात्र कौटूंबिक अत्याचार हा सहन करावा लागतो असे उत्तरदात्यांचे म्हणणे आहे.

**सारणी क्रं. 03**

**कौटूंबिक अत्याचार सहन करण्याची कारणे – मोलकरणींचे अभिमत दर्शक सारणी**

| अ.क्र. | कौटूंबिक अत्याचाराची कारणे | प्रमाण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | कौटूंबिक मान/प्रतिष्ठा | 12 | 24 |
| 2 | मुलांसाठी | 9 | 18 |
| 3 | घरगुती मामला आहे | 8 | 16 |
| 4 | कुटुंबाचा पाठींबा नसतो | 7 | 14 |
| 5 | आर्थिक दुष्ट्या परावलंबी | 3 | 6 |
| 6 | घटस्फोटीत विधवा स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टीकोण | 3 | 6 |
| 7 | बाई म्हणून ते सहन करावेच लागते | 4 | 8 |
| 8 | पुरुष तर बरोबर असतो | 3 | 6 |
| 9 | ह्या करीता स्वतःला दोषी समजणे | 1 | 2 |
| | **एकूण** | **50** | **100** |




उपरोक्त सारणी कौटूंबिक अत्याचाराचे अभिमत दर्शक असून आजही कौटूंबिक प्रतिष्ठा महत्त्वाची वाटते. अनेक मध्यम वर्गीय कुटूंबात स्त्रीवर अत्याचार होत असतानां देखील घराबाहेर पडल्यावर लोक काय म्हणतील ही भिती तसेच पदरी मुले असल्यानंतर घराबाहेर जाण्याचा प्रश्नच नाही तो अवघड होऊन बसली. मोलकरनींना शाब्दिक, शारीरिक, मानसिक त्रास सहन करावा लागतो.

**निष्कर्ष (Conclusion) :–**

- मोलकरीन स्त्रियांना 99 टक्के कौंटुबिक हिंसाचार सहन करावा लागतो. हिंसाचाराच्या स्वरुपात वैधर्म्यता आहे.
- कौंटुबिक हिंसाचाराला घरगुती मामला समजल्यामुळे त्यात वाढ होत आहे.
- आर्थिक निर्णयात सहभागी नसणे आणि तिच्या कमाईवर स्वतःचा हक्क नसल्यामुळे आर्थिक स्वरुपाने स्वावलंबी नाही.
- कामाचे तास कधी निश्चित तर कधी अनिश्चित असल्यामुळे व्यावसायिक घटक कौंटुबिक अत्याचाराला कारणीभूत ठरत आहे.
- स्वतःचा कामाकडे बघण्याचा दृष्टिकोण कमी लेखल्यामुळे शाब्दिक अत्याचारात वाढ होत आहे.
- सामाजिकरणाच्या प्रक्रियेत ती सुद्धा महत्त्वपूर्ण घटक आहे. या पद्धतीने व्यवस्थेत बदल होणे आहे.
- कौटुंबिक अत्याचार प्रगट न केल्यामुळे त्या वारंवार या हिंसाचाराला बळी पडतात.
- आज महिला बचत गट, बँक, पतसंस्था, सेवाभावी संस्था, मोलकरीन संघटना आर्थिक स्वावलंबना करीता कार्य करीत असल्या तरी शारीरिक, शाब्दिक, आर्थिक हिंसाचाराचे उच्चाटन झाले असे म्हणता येणार नाही.
- मोलकरीन करीता ज्या केवळ साक्षर आहे त्यांना उच्च शिक्षणाकरीता रात्रीच्या शाळा, महाविद्यालय सुविधा देऊन साक्षरतेचे प्रमाण वाढविल्यास शारीरिक हिंसाचार कमी होऊ शकतात.
- घरकूल योजना, इंदिरा आवास योजना, अशा आवासीय योजनेद्वारा झोपडपट्टी /गलिच्छ वस्त्या निर्मूलन केल्यास, उपयुक्त घरकूल उपलब्ध झाल्यास हिंसाचाराचे प्रमाण कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.





- कौटुंबिक हिंसाचारामुळे आरोग्यावर जे अनिष्ट परिणाम होतात त्या करीता संबंधित क्षेत्रात मोबाईल हॉस्पिटल सुविधा उपलब्ध करणे.
- समाजाचा कौटुंबिक हिंसाचाराकडे बघण्याचा दृष्टिकोण बदलवण्याची गरज आहे.
- पोलिस सुरक्षा यंत्रणा प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून गलिच्छ वस्त्यात रात्रीच्या वेळेस बैठेपथक असणे गरजेचे आहे.
- कौटुंबिक हिंसाचारग्रस्त महिलांकडे बघण्याचा दृष्टिकोण समाजातील घटकांनी सकारात्मक ठेवणे.
- कौटुंबिक हिंसाचाराच्या कायद्याच्या माहिती बद्दल जाण–जाणीव निर्माण करण्याकरीता फिरते कायदे तज्ञांचे सुट्टीच्या दिवशी व्याख्यान, सल्ला, मार्गदर्शन केंन्द्र झोपडपट्ट्यात सुरु होणे आवश्यक आहे.
- सामाजिकरण लिंगाधिष्ठित नव्हे तर लिंगभाव जाणिवेतून होणे गरजेचे आहे.

**सूचना :–**

- कुटूंबातील स्थान सिध्द करणे.
- 2005 च्या कायद्याविषयी जाण–जाणिवा जागृती स्वतः मध्ये आणली पाहिजे.
- कौटूंबिक अत्याचाराचे प्रकटीकरण करणे फार गरजेचे आहे.
- समाजात कोणतेही कार्य निकृष्ट दर्जाचे नाही स्वतः समजूत करणे.

**शिफारशी :–**

- मासिके, पक्षिक, दुरदर्शन, वर्तमानपत्र, सोशलमिडीयाच्या प्रबोधन माध्यमाने कायद्याविषयी माहिती प्रसारित–प्रचारित करणे.
- सार्वजनीक सुट्टीच्या दिवशी न्यायाधिशांचे, वकीलांचे, समाजिक गैर शासकीय संस्थाने पुढाकार घेऊन या विषयावर चर्चासत्रांचे आयोजन करणे.
- मोलकरीन, स्त्रीकडे बघण्याचा दृष्टीकोण कीती निकृष्ट दर्जाचे कार्य करते, परिवर्तीत करणे गरजेचे आहे.
- कायद्याने मोलकरीन संघटनेला बळकट करण्याकरीता त्यांच्या रास्त मागण्या पूर्ण कशा करता येतील या करीता सामाजिक सहकार्य करणे.
- कायदा आणि समाजात, कुटूंबात मिळणारी प्रत्यक्ष वागणूक यात समन्वय असणे आवश्यक आहे.
- स्त्रिकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टीकोण वाढविण्याकरीता रा.से.यो. च्या स्वयंसेवक कार्यक्रम अधिकारी यांनी पथनाट्य पोस्टर्स, प्रबोधन, व्याख्यान, यांच्या माध्यमाने जाणीव जागृतता वाढविणे.
- एकुणच सामाजीकरणाच्या प्रक्रियेत बदल होणे आवश्यक आहे.
- सेवाभावी संस्था लोकसहभाग, कौंटुबिक हिंसाचार कमी करण्यास चालविलेली मोलकरीन संघटनांच्या प्रयत्नाला समाजाने सहकार्य करणे.

**संदर्भ सूची :**


- भारतीय समाज प्रश्न आणि समस्या – डॉ. बी.एम. क–हाडे, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, 1 ली आवृत्ती : जून 2009.
- प्रगत सामाजिक संशोधन पद्धती व सांख्यिकी, प्रा.डॉ. दिलीप खैरनार, डायमंड पब्लिकेशन्स प्रथम आवृत्ती, फेब्रुवारी 2009.
- औद्योगिक समाजशास्त्र – प्रा.शा.बा. चव्हाण कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 12 जुलै 2005.
- कौटुंबिक हिंसाचार – मेघा ताडपंत्रीकर, डायमंड पब्लिकेशन्स, प्रथम आवृत्ती, 2012.
- सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे – डॉ. प्रदीप आगलावे, श्री. साईनाथ प्रकाशन, धरमपेठ, नागपूर, पाचवी आवृत्ती, जानेवारी 2015.
- औद्योगिक समाजशास्त्र, डॉ. सुधाताई काळदाते, विद्या प्रकाशन, औरंगाबाद.
- औद्योगिक समाजशास्त्र – डॉ. पी.के. कुलकर्णी, पिंपळापूरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.
- भारतातील सामाजिक समस्या – प्रा. रा.ज. लोटे, विद्या प्रकाशन, औरंगाबाद.